**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ४३९/२०१६ मधील निशाणी क्र. ५० कडील अर्जावर आदेश</u>**

१) अर्ज वाचला. म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांतील विद्वान वकीलांना ऐकले. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

२) रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, दिनांक ०९/०१/२०२५ रोजी वादीचे साक्षीदार दिगंबर कुलकर्णी यांच्या उलटतपासासाठी प्रतिवादीला व त्यांच्या विद्वान वकीलांना पुकारले असता गैरहजर असल्याने प्रतिवादीतर्फे वादीचे साक्षीदार दिगंबर कुलकर्णी यांचा उलटतपास नाही असा आदेश निशाणी क्र. ३८ खाली पारीत करण्यात आला आहे. त्यानंतर प्रतिवादीतर्फे प्रस्तुत अर्ज आज दिनांक ०३/१२/२०२५ रोजी दाखल केला आहे. प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास केलेला विलंब विचारात घेता व प्रकरणाचे स्वरुप व अर्जातील नमूद कारणे विचारात घेता माझ्या मते प्रतिवादीने वादीच्या साक्षीदाराला साक्षी भत्ता देण्याच्या अटीवर प्रतिवादीला वादीच्या साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची संधी देवुन प्रस्तुतचे प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निकाली काढणे न्यायाचे व उचित आहे. त्यामुळे वरील नमुद कारणांमुळे माझ्या मते प्रस्तुतचा अर्ज खर्चाच्या अटीवर मंजुर करणे न्यायाचे व उचित आहे. सबब, हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

१) प्रतिवादीने वादीचे साक्षीदार दिगंबर कुलकर्णी यांना रुपये २००/- (रुपये दोनशे फक्त) इतका साक्षी भत्ता देण्याच्या अटीवर प्रस्तुत मंजूर करण्यात येतो व त्यानुसार निशाणी क्र. ३८ खाली दिनांक

०९/०१/२०२५ रोजी प्रतिवादीविरुद्ध पारीत केलेला 'उलटतपास नाही' हा आदेश रद्द करुन प्रतिवादीला वादीच्या साक्षीदाराचा उलटतपास घेण्यास परवानगी देण्यात येते.

२) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2025.12.03 17:28:21 +0530

(पां. लिं. घुले)

दिनांक– ०३/१२/२०२५

२रे सह दि. न्या. व. स्तर, कराड.